“मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम” योजनेच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समितीवर नामनिर्देशन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१७७/उ-७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३१ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.योजना-२०१९/प्र.क्र.१२१/उद्योग-७, दि. १/०८/२०१९.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) या योजनेच्या धर्तीवर राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिलतेला कालानुरुप वाव देणारी सर्वसमावेशक योजना शासनाच्या नविन औद्योगिक धोरण- २०१९ मुद्दा क्रमांक ५ (२) व ९.२ नुसार “मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम” योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याचा शासन निर्णय दि.१.८.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय-

राज्यातील शहरी व ग्रामीण युवक युवतींना स्वंयरोजगाराच्या व रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होण्यासाठी योजनेची प्रभावी अंमलबजावणी उद्योग संचालनालयाअंतर्गत कार्यरत जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हास्तरीय खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्या मार्फत करण्यात येत आहे. तसेच योजनेअंतर्गत २० टक्के अनुसूचित जाती/जमाती करीता व ३० टक्के महिला उद्योजिकांकरीता आरक्षण देण्यात आलेले असून, प्राप्त अर्जाची छाननी, अर्जदाराचे समुपदेशन व बँकांना कर्ज प्रस्ताव शिफारस करणे व मंजूर करणे इ. आवश्यक प्रशासकीय कार्यवाहीसाठी महाव्यवस्थापक, जि.उ.कें. यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय छाननी व समन्वय समिती, राज्य स्तरीय संनियत्रण समिती गठित करण्यात आलेल्या आहेत.

२. जिल्हास्तरीय छाननी व समन्वय उपसमिती मध्ये जिल्हातील २ प्रमुख औद्योगिक संघटना/ संस्था/ औद्योगिक समुहाचे प्रतिनिधी सदस्य म्हणून प्रतिनिधीत्व करतील असे शासन निर्णयातील मुद्दा क्र. ६.२ मध्ये नमुद केलेले आहे.

३. या शासननिर्णयाद्वारे “बुध्दीस्ट इंटरप्रियनियर्स असोसिएशन ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री” (नोंदणी भाग८/प.क्र. ११०७८४) या औद्योगिक संघटनेस “मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम” अंतर्गत जिल्हास्तरीय छाननी व समन्वय उपसमिती आणि राज्यस्तरीय सनियंत्रण समितीमध्ये औद्योगिक संघटनांचे नामनिर्देशन करण्याबाबत या खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१) शासन निर्णय दि.१.८.२०१९ मधील परिच्छेद ६.२ मधील नमुद गठित उपसमिती मध्ये सदस्य म्हणून बुध्दीस्ट इंटरप्रिनियर्स असोसिएशन ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री या संघटनेस अथवा आवश्यकतेनुसार इतर औद्योगिक संघटना यांचे प्रतिनिधी यांना समितीचे अध्यक्ष नामनिदेर्शित करतील.

२) तसेच शासन निर्णय दि.१.८.२०१९ मधील परिच्छेद ७.१ मध्ये मा.विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील गठित संनियत्रण समितीमध्ये निमंत्रित सदस्य म्हणून नमुद संघटनेचे तथा आवश्यकतेनुसार इतर औद्योगिक संघटना यांचे प्रतिनिधी यांना समितीचे अध्यक्ष नामनिदेर्शित करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्यांचा संगणक क्रमांक २०१९०८३११७०१४९४११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Abhinandan Namdev More

Digitally signed by Abhinandan Namdev More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry,Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6c8b91ccaee7508f2f1dcfc29d3dd5399ac21d5272d583f8d75608dec4c7e38, serialNumber=d2ebc2a88520617818333da2c284626a51a769b8cdefe39bc4a8a166fe51bdd6, cn=Abhinandan Namdev More
Date: 2019.08.31 17:07:48 +05'30'

(अभिनंदन मोरे)
कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
५. मा. मंत्री (सर्व) व मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा. विरोध पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. मा. विरोध पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व विभाग)
१०. विभागीय आयुक्त, कोकण विभाग / औरंगाबाद विभाग / पुणे विभाग / नाशिक विभाग / अमरावती विभाग / नागपूर विभाग.
११. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१३. सर्व जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
१४. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या नियंत्रणाखालील महामंडळे/शासकीय उपक्रम यांचे
१५. व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी. (उद्योग संचालनालयामार्फत)
१६. उद्योग सह संचालक/अधिक्षकीय उद्योग अधिकारी, मुंबई प्राधिकरण विभाग /कोकण विभाग / पुणे नाशिक / अमरावती / औरंगाबाद / नागपूर. (उद्योग संचालनालयामार्फत)
१७. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (सर्व) (उद्योग संचालनालयामार्फत)
१८. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा) महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
१९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२०. अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (विघयो), मंत्रालय, मुंबई-३२.
२२. आदिवासी विकास विभाग (का-३), मंत्रालय, मुंबई-३२.
२३. अल्पसंख्यांक विकास विभाग (का-८), मंत्रालय, मुंबई-३२.
२४. वित्त विभाग (व्यय-१६), मंत्रालय, मुंबई-३२.
२५. नियोजन विभाग (योजना-१४६१), मंत्रालय, मुंबई-३२.
२६. निवडनस्ती (उद्योग-७), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.